R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक
# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029
लातूर
वर्ष : ६ वे, अंक नं. : ४५
दि.२७ जानेवारी २०२६,वार: मंगळवार
पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# एकूर्गा जिल्हा परिषद गटात वारं फिरलं : भाजपा पक्षातील असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

लातूर / प्रतिनिधी : मिनी मंत्रालय म्हणुन ओळख असलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची धामधुम जिल्हयात सुरु आहे. काँग्रेस पक्षाने लातूर महानगर पालिका निवडणुकीत एक हाती सत्ता मिळवल्या नंतर काँग्रेसचा गढ असलेल्या मांजरा पट्ट्यात काळाची पावले ओळखत भाजपातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा ओढा काँग्रेस पक्षाकडे वाढला आहे. एकूर्गा जिल्हा परिषद गटातील काँग्रेस आघाडीचे उमेदवार दत्तात्रय काकासाहेब टेकाळे यांच्या नेतृत्वात लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत एकुर्गा गटातील भाजपातील असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बाभळगाव येथे काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यांनी घेतला काँग्रेस पक्षात प्रवेश

काँग्रेसच्या धोरणावर व लातूर ग्रामीणचे मा. आ. तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत एकूर्गा ग्रामपंचायचे सदस्य बालाजी व्यंकट चव्हाण, बापू इंगळे, रंजीत अडसूळ, गोविंद रोडके, अमर खेडकर, विष्णु इंगळे, संदिप घुटे, अनिल इंगळे, राम घुटे, काका भालेकर, अजय गंगणे, दादा घुटे, अविष्कार कोरके, व्यंकटेश हजारे, रवि घुटे, महेश सोमवंशी, सुमित घुटे, विष्णु घुटे, समाधान गायकवाड, सचिन ढवारे, अजय सुरवसे यांच्यासह भाजपाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी काँग्रेसचा झेंडा हाती घेत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



छावा संघटनेच्या पदाधिकारी यांनी दिला एकुर्गा गटातील काँग्रेस उमेदवारांना पाठींबा

जिल्हा परिषद व पंचाय समिति निवडणुकीत काँग्रेस आघाडीचे उमेदवार दत्तात्रय काकासाहेब टेकाळे यांच्यासह सर्व उमेदवारांना छावा संघटनेचे पदाधिकारी ड. व्यंकटेश नागटीळक, अरविंद गाडे यांनी पाठींबा दिला आहे. याबाबत लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची भेट घेऊन काँग्रेस पक्षाच्या एकुर्गा गटातील सर्व उमेदवारांना निवडून आणण्यासाठी कार्य करणार असल्याचा विश्वास दिला.

मांजरा पट्टायात सहकाराची चळवळ रुजली आहे. शेतकऱ्यांच्या हिताची जपवणुक करणारे नेतृत्व म्हणुन काँग्रेस नेत्यांकडे पाहिले जाते. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, माजी मंत्री, सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांनी दुरद्रष्टी दाखवत याभागाच्या सर्वांगीन विकासासाठी बॅरेज उभारुन शेतीच्या सिंचनासाठी पाण्याची सोय उपललब्ध करुन दिली. शेतकरी व सर्वसामान्या नागरिक आर्थिक सक्षम व्हावा यासाठी साखर कारखानदारी उभारली. हा विकासाचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य माजी मंत्री तथा आमदार अमित देशमुख व जिल्हा बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार धिरज देशमुख निष्ठेने करत आहेत. जुन्या जाणत्या लोकांना तर काँगेस पक्षावर विश्वास होताच आता युवा पिढीला देखील काँग्रेस पक्षाच्या धोरणावर व नेतृत्वावर विश्वास निर्माण झाला आहे. याचेच घोतक म्हणजे भाजपातील असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात झालेला जाहीर प्रवेश हे आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकी दरम्यान भजपातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या काँग्रेस पक्षात झालेल्या प्रवेशामुळे एकुर्गा गटात काँग्रेसचे बळ वाढले आहे. सोबतच भाजपा कमजोर पडली असुन भाजपा नेत्यांचे मनोबल घटले आहे. निवडणुक प्रचाराच्या सुरुवातीलाच भाजपाला बसलेला या झटक्याने मांजरा पट्ट्यात भाजपा बॅक फुटवर गेल्याचे पहायला मिळत आहे.

यावेळी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते ओम घुटे, नारायण पाटील, पंकज पटाडे, राम कोरके, विष्णु पटाडे यांच्यासह एकुर्गा गावातील नागरिक यांची उपस्थिती होती.

# निवडणूकीत कर्जमाफीचे आश्वासन देऊन निकालानंतर विसारणाऱ्या व भूलथापा देणाऱ्या विरोधकांना या निवडणुकीत मत मागण्याचा अधिकार नाही -माजी मंत्री, आमदार अमित देशमुख

लातुर प्रतिनिधी: शेतकऱ्यांच्या सोयाबीनला भाव न देणारे, खरेदी केंद्रावर अडवणूक करणारे आणि निवडणुकीत कर्जमाफीच्या भूलथापा देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विरोधकांना आता मत मागण्याचा अधिकार उरलेला नाही. जिल्हा परिषदेत ठेकेदारांचे खिसे भरणाऱ्यांना आता त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे, अशा कडक शब्दांत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महायुती सरकारवर तोफ डागली. लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ अनुषंगाने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शेषराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. २६ जानेवारी रोजी लामजना येथील बाजार मैदान भागात सकाळी पार पडलेल्या प्रचार सभेत मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शेषेराव पाटील, श्रीशैल उटगे, अमर खानापुरे, सचिन पाटील किरण बाबळसुरे, सुभाष पवार, समद पटेल, चंदरनाना पाटील, गणपतराव बाजुळगे, संजय सुग्रीव लोंढे, बालाप्रसाद बिदादा, दत्तोपंत सूर्यवंशी, बालाजी कांबळे, बाळासाहेब सांगवे, नारायण बजाज, अशोक शेळके, बाबासाहेब गायकवाड, मुकेश बिदादा, शिवा पाटील, जयराज पाटील, रामदास चव्हाण, उदयसिंह देशमुख, सुग्रीव लोंढे, जहीर पटवारी, बालाजी बिराजदार, महेबूब कारभारी, विशाल कांबळे, इस्माईल शेख, राहुल घुळे, दीपक राठोड, काँग्रेस महाविकास आघाडीचे जिल्हा परिषद लामजना गटातील उमेदवार सौ शालिनी चव्हाण, किल्लारी गटातील उमेदवार सुभाष पवार, खरोसा गटातील उमेदवार सचिन पाटील तर पंचायत समिती लामजना गणातील उमेदवार अंजूमबी महेबूब कारभारी, नागरसोगा येथील उमेदवार भाग्यश्री सूर्यवंशी, किल्लारी येथील उमेदवार माधव बिराजदार, तळणी येथील उमेदवार अभिजीत देशमुख, खरोसा येथील उमेदवार शीतल विष्णू फावडे, कारला येथील उमेदवार प्रवीण काळे आदिसह काँग्रेस व महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, सामान्य माणसाच्या मतावर पोळ्या भाजण्याचे काम भाजपची मंडळी करीत आहेत. मतदारसंघात हजारो कोटी निधी आणल्याचे ते सांगतात, मग विकास कामे का दिसत नाहीत असा आता जनतेलाच प्रश्न पडला आहे, सत्तेच्या नशेत धुंद झालेले हे सत्ताधारी लोक, फक्त ठेकेदारांचे खिसे भरण्याचे काम करीत आहेत, कोणत्याही निवडणुका आल्या की भाजपकडून उमेदवाऱ्याही ठेकेदारांना दिल्या जात आहेत, औसा तालुक्यातील बहुतांश भाजपाचे उमेदवार ठेकेदारच असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत त्यांना धडा शिकवावा असे आवाहन जाहीर सभेत बोलताना केले.

यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले, सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयकारी भूकंपाची प्रारंभीच आठवण करून या आपत्ती काळात काँग्रेस नेत्यांनी जो जागतिक पुनर्वसन प्रकल्प राबवला त्याच्या दुरुस्तीचे कामही भाजपच्या मंडळींना मागच्या सत्ता काळात करता आले नसल्याचे यावेळी बोलताना सांगितले. काँग्रेस पक्षाने बांधलेले रस्ते, इमारती, याची दुरुस्तीही ज्यांना शक्य होत नाही असे सांगीतले.

लातुर महानगरपालिका निवडणूक नुकतीच झाली आणि प्रचारात विरोधकांनी आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी पुसून टाकण्याची भाषा केली गेली ज्याचे उत्तर लातुरवासीयांनी चोख दिले. सत्तेच्या नशेत बेधुंद होऊन सामन्य माणसाच्या वचारांचा बाजार मांडणाऱ्या आदरणीय नेत्यांनी आपल्याला दिलेल्या विचारांचा खून करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या या लोकांना त्यांची जागा दखविण्याची वेळ आता आली असून या निवडणुकीत आपण ही संधी गमावू नये असे अवाहन करीत विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता लातुर जिल्हा परिषदेला आपल्याला गत वैभव प्राप्त करून घ्यायचे आहे.प्रत्येक कामासाठी जिल्हा परिषदेत दर पत्रक या लोकांनी तयार करून ठेवले आहे.आपल्याला प्रत्येक शासन योजनेसाठी अर्ज केल्यास पैसे आपल्याला पैसे मोजावे लागतात त्यासाठी दलाल ठेवलेले आहेतच.आपल्याला या सर्वांचा बंदोबस्त करायचा असून हे आपल्यालाकडे मत मागण्यासाठी येतील आपल्याला धमकावतील यांच्या धमक्यांना आपण अजिबात घाबरायचे नाही अशा शब्दात मतदारांना आमदार देशमुख यांनी विश्वास दिला.

पुढे बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की,आज ग्रामीण भागातील रस्ते नादुरुस्त आहेत कारण या रस्त्याची कामे करताना टक्केवारी घेतली गेली ज्यामुळे वर्षाचे ३६५ दिवस मतदार राजा,जनता त्रस्त आहे.काँगेस पक्ष्याने या जिल्हा परिषद व पंचायत मिती निवडणुकीत दिलेले सर्व उमेदवार स्वच्छ प्रतिमेचे, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेले,ठेकेदारी न करणारे सर्व सामान्य माणसाच्या मनातील, सर्व सामान्य कुटुंबातील उमेदवार दिलेले असून आपण आमच्या सर्व उमेदवारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहावे आणि आपल्याकडे असलेल्या मताचे शस्त्र उपयोगात आणावे व प्रचंड बहुमतांनी त्यांना विजयी करून जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये पाठवावे असे आवाहन त्यांनी उपस्थित सर्व मतदारांना केले.

यावेळी बोलताना बालप्रसासाद बिदादा म्हणाले की, आज ज्या लामजना गावात ही सभा पार पडत आहे या गावावर आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे प्रेम होते अगदी तसेच प्रेम आणि विश्वास आमदार अमित देशमुख साहेबांचा असून आपण या निवडणुकीत हे प्रेम आणि आपल्यावर असलेला विश्वास सार्थ ठरवावा आणि काँग्रेस अघाडीच्या उमेदवाराना निवडून द्यावे अशी विनंती त्यांनी केली. यावेळी बोलताना श्रीशैल उटगे म्हणाले की,आपण सर्वजण आज लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीला सामोरे जात असून ही निवडणूक ग्रामीण भागातील नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता अत्यंत महत्वाची आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती विभागाच्या माध्यमातूनच ग्रामीण भागातील विकासकामे केली जातात,याशिवाय ग्रामीण भागाचा विकास शक्य नाही हे आपण सर्वप्रथम लक्षात घ्यावे. आपली सर्वांची मेहनत आदरणीय नेत्याचे मार्गदर्शन आणि मतदारांची साथ मिळाल्यानंतर यश कसे मिळते हे आपण लातुर महानगरपालिका निवडणुकीत पाहिले आहे. आणि त्याचीच पुनरावृत्ती या निवडणुकीत दिसणार असून आपल्याला केवळ लढायचे नाही तर लढण्यासोबत जिंकायचे आहे ही खूणगाठ आपण बांधावी असे ते म्हणाले. दरम्यान या जाहीर प्रचार सभेत रामदास चव्हाण,सुभाष पवार,सचिन पाटील,सौ. शालिनी चव्हाण,सौ.शीतल फावडे,सौ. अंजुमबी शेख, सौ.भाग्यश्री सुर्यवंशी,माधव बिरादार,अभिजित देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करून काँग्रेस आघाडीच्या सर्व उमेदवाराना मतरुपी आशीर्वाद देऊन सेवेची संधी उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणपतराव बाजुळगे यांनी केले तर शेवटी आभार बालाजी कांबळे यांनी मानले. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बालाप्रसाद बिदादा यांच्या लामजना येथील प्रेम-कुंज निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लामजना ग्रामपंचायतीचे माजी सदस्य तातेराव सरवदे व जनाधार मोर्चाचे औसा तालुका उपाध्यक्ष सिताराम कांबळे यांनी कार्यकर्त्यांसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रारंभी लामजना येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यानजीक जाऊन त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

# ७७ वा प्रजासत्ताक दिन

आम्ही भारताचे लोक  लोक अजून आहेत, पण लोकशाही आहे का?

२६ जानेवारी हा दिवस भारताच्या संविधानाचा विजयदिन मानला जातो. पण ७७ वर्षांनंतर आज प्रश्न असा उभा राहतो की संविधानाचा विजय झाला की सत्तेचा? प्रजासत्ताक दिनाच्या मंचावरून संविधानाची शपथ घेतली जाते, पण प्रत्यक्ष कारभारात त्या संविधानाच्या आत्म्याशी गद्दारी होत असल्याचे चित्र अधिकाधिक स्पष्ट होत चालले आहे. आम्ही भारताचे लोक या ऐतिहासिक वाक्याला आजही तितकेच महत्त्व आहे का, की ते केवळ सरकारी समारंभातील औपचारिक वाक्य बनून राहिले आहे?

संविधान सर्वोच्च की सत्तेचा अहंकार?

संविधानाने संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका यांच्यात संतुलन निर्माण केले. मात्र अलीकडच्या काळात सत्ताकेंद्रित निर्णयप्रक्रिया, अध्यादेशांचा मारा आणि संसदीय चर्चेचा होत चाललेला ऱ्हास हे लोकशाहीसाठी चिंताजनक संकेत आहेत. कायदे बनवताना चर्चा कमी आणि गोंधळ जास्त दिसतो. बहुमत म्हणजेच सत्य आणि सत्ता म्हणजेच राष्ट्र अशी धोकादायक समजूत रुजवली जात आहे.

संविधानिक संस्थांची स्वायत्तता हळूहळू कमी होत आहे का, हा प्रश्न आता केवळ विरोधकांचा नाही, तर सजग नागरिकांचाही आहे. संस्था कमजोर झाल्या, तर लोकशाही केवळ नावापुरती उरते.

समानता : निवडक नागरिकांसाठीच?

समानतेचा दावा केला जातो, पण प्रत्यक्षात समाज अधिकाधिक विभागला जात आहे. जात, धर्म आणि राष्ट्रवाद यांच्या आधारे राजकारण तापवले जात आहे. निवडणुकांच्या काळात समाजात ध्रुवीकरण वाढवणारी भाषा वापरली जाते, आणि नंतर एक भारत, श्रेष्ठ भारतचे घोषवाक्य दिले जातेहा दुटप्पीपणा नाही, तर काय आहे?

दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि स्त्रियांवरील अत्याचारांची आकडेवारी चिंताजनक आहे. तरीही सत्ताधारी व्यवस्थेची प्रतिक्रिया अनेकदा मौनाची किंवा समर्थनाची असते. समानता जर खरोखरच अस्तित्वात असती, तर न्याय मागणाऱ्यांना देशद्रोही ठरवण्याची वेळ आली नसती.

न्याय : अंध, पण निवडकांसाठी नाही

न्यायव्यवस्थेचा आदर भारतीय लोकशाहीची ओळख आहे. पण न्याय मिळण्याच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्हे उभी राहत आहेत. सामान्य नागरिकांसाठी न्याय म्हणजे वर्षानुवर्षांची प्रतीक्षा, तर सत्तेशी जवळीक असणाऱ्यांसाठी तो आश्चर्यकारक वेगाने मिळतोअशी जनमानसातील धारणा धोकादायक आहे, पण दुर्लक्ष करण्याजोगी नाही.

तपास यंत्रणांचा वापर राजकीय दबावासाठी होत असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. विरोधकांवर कारवाई आणि सत्ताधाऱ्यांवरील मौनहे दृश्य लोकशाहीच्या आत्म्याला कमकुवत करणारे आहे.

बंधुता : हेतुपुरस्सर दुर्लक्षित मूल्य

संविधानकर्त्यांनी बंधुतेला लोकशाहीचा आत्मा म्हटले होते. पण आज द्वेषपूर्ण भाषण, अफवा, सोशल मीडियावरील विषारी प्रचार आणि आम्ही विरुद्ध ते अशी मानसिकता जोपासली जात आहे. बंधुता निर्माण करण्याऐवजी मतभेद भडकवण्यात राजकीय फायदा शोधला जात आहे.

धर्म, भाषा आणि प्रांत यांच्या आधारे नागरिकांना एकमेकांविरुद्ध उभे करणे हे सत्तेचे सोयीचे राजकारण ठरते, पण राष्ट्रासाठी ते आत्मघातकी आहे.

राष्ट्रवाद की संविधानवाद?

आज राष्ट्रवादाची व्याख्या बदलली जात आहे. सरकारवर प्रश्न विचारणे म्हणजे राष्ट्रविरोधी, आणि सत्तेला पाठिंबा देणे म्हणजे देशभक्तीअशी सरधोपट मांडणी केली जात आहे. मात्र खरा राष्ट्रवाद हा संविधानाशी निष्ठा ठेवण्यात आहे, व्यक्ती किंवा पक्षाशी नव्हे.

संविधानापेक्षा कुणीही मोठे नाहीहा विचार स्वीकारला नाही, तर प्रजासत्ताकाचा आत्मा हरवेल.

निष्कर्ष

७७ वा प्रजासत्ताक दिन म्हणजे आत्मस्तुतीचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. तिरंगा फडकवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच संविधानिक मूल्यांचे रक्षण करणेही गरजेचे आहे. समानता निवडक नको, न्याय सोयीस्कर नको आणि बंधुता राजकीय हत्यार नको.

आम्ही भारताचे लोक हे शब्द जर खरोखर जिवंत ठेवायचे असतील, तर सत्तेपेक्षा संविधान मोठे आहे, हे पुन्हा एकदा ठामपणे सांगावे लागेल.

नाहीतर प्रजासत्ताक दिन साजरा होत राहील, पण प्रजासत्ताक मात्र हळूहळू इतिहासजमा होईल.

# भारतीय संविधान प्रजासत्ताक भारत आणि आर्थिक न्याय

२६ जानेवारी १९५० प्रजासत्ताक दिनी ३९५ कलमे २२ प्रकरणे ९ परिशिष्टे असलेल्या भारतीय संविधानाचा अंमल सुरू झाला आणि देश सर्व प्रजेची सत्ता असणारा प्रजासत्ताक भारत बनला.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. लोकांच्या. सामाजिक ,आर्थिक जीवनात रक्ताचा एक थेंबही न सांडता क्रांतीकारी परिवर्तने आणता येतील अशी शासन प्रणाली म्हणजे लोकशाही, अशी लोकशाही व्यवस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होती. राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक न्याय , आर्थिक न्याय यासाठी त्यांनी स्वतंत्र संघर्ष उभा केला आणि त्यात ते यशस्वी झाले .निवडणूकीच्या आणि आरक्षणाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रक्ताचा एक थेंबही न सांडता राजकीय, सामाजिक, आणि आर्थिक क्रांती संविधानाच्या माध्यमातून केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बॅरिस्टर ही पदवी सोडली तर , सगळ्या पदव्या अर्थशास्त्रातील आहेत. ते जागतिक कीर्तीचे अर्थतज्ञ होते. एम .ए .साठी ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती,पी. एचडी .साठी ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती,डी. एस्सी. साठी रूपयाचा प्रश्न त्याचा उगम व उपाय. १९२३ नंतर डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रीय कोणताही ग्रंथ प्रकाशित केला नाही. त्यांनी केलेल्या सगळ्या चळवळी , घेतलेले निर्णय या प्रत्येकावर अर्थतज्ञ म्हणून एक वेगळा ठसा उमटलेला आहे. भारतीय संविधान हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे.

संपत्तीमुळे माणूस स्वावलंबी होतो ,प्राचीन काळी शूद्रांनी आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होऊ नये हा मनुस्मृतीचा आदेश मानवाधिकार च्या विरोधी होता..

आर्थिक समतेशिवाय राजकीय स्वातंत्र्याला महत्त्व उरणार नाही. कारण सुरक्षा व संरक्षणाची हमी देणारे आर्थिक स्वातंत्र्य नसेल. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत आर्थिक न्यायाचे तत्व देताना देशाच्या विकासात सत्ता व शासनात भागीदारी देण्यासाठी अनुसूचित. जाती. अनुसूचित जमाती. इतर मागासवर्गीय समाजाची शिफारस केली आहे. जोपर्यंत शासन प्रशासनात या वर्गाचे प्रमाण वाढेल तेव्हाच आर्थिक समानता निर्माण करणे शक्य आहे.

शूद्र (ओ. बी.सी.) अतिशूद्र ( अनु. जाती. अनु. जमाती.) आदिवासी, महिला आणि सवर्ण समाज हे राजकारणात समान आधिकारी होतील , तेव्हा चातुर्वर्ण्य जन्य विषमता आपोआप धुळीस मिळेल. मागासवर्गीयांच्या जीवनात सांविधानिक रितीने सामाजिक आणि आर्थिक क्रांती घडवून आणण्यासाठी आरक्षणाशिवाय दुसरे कोणते माध्यम होते? हे संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ठासून सांगितले.

पहिली गोलमेज परिषद ही भारताच्या संविधानाविषयी विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.या गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण धोरणाचा जोरदार पुरस्कार केला.मागासवर्गीय च्या गुलामीचा संबंध भारताच्या भावी स्वातंत्र्याशी ,संविधानाशी जोडला. समान नागरिकत्व ,मूलभूत अधिकार, अन्याय अत्याचारापासून मुक्तता, भेदभावा विरुद्ध संरक्षण सर्व मागास जाती जमातींना विधानमंळाध्ये ,नोक-या मध्ये पुरेसे प्रतिनिधित्व करण्यात यावे अशा मागण्याचा जोरदार पुरस्कार केला. गोलमेज परिषदेत भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणी .सोबत१६ जानेवारी १९३१ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, देशातील एखादी नोकरी एकाच जातीची मिरासदारी होऊन बसली तर देशाच्या सार्वजनिक जीवनात धोका होऊन बसेल मला वाटते, अत्यंत महत्त्वाचे म्हणजे गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य वर्गाकरिताच आरक्षण मागितले नाही तर उच्च वर्गीयांची मक्तेदारी संपवून मागासवर्गीय जातींना योग्य व समाधानकारक वाटा देण्याची मागणी केली.

संविधान निर्मितीच्या काळात आरक्षणावरून तुफान वादळ उठले होते, पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समर्थ लेखणीने व अभ्यासपूर्ण पूर्ण वाणीने त्यांना प्रति उत्तर दिले. बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात समतेसाठीच विषमता या लेखात म्हणतात समता वाद्यांचे ध्येय सर्वांना समतेने वागवून चालणे शक्य नाही, जेथे सर्व व्यक्ती समान आहेत तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागविल्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारखे लेखून चालणे म्हणजे समता प्रस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय.

सामाजिक न्याय इतकाच आर्थिक न्यायाचा लढा तेवढाच महत्त्वाचा आहे. भारतीय संविधानात लोकशाही एक राजकीय व्यवस्था म्हणून स्वीकारली असली तरी,आपले ध्येय आर्थिक लोकशाहीचे आहे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्गदर्शक तत्वाच्या चर्चे चा समारोप करताना संविधान सभेत निक्षून सांगितले. भारतीय समाज व्यवस्था हे सामाजिक दृष्टीने विषमतेचे माहेर घर आहे ..विषम समाज रचनेत समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रतिनिधित्वाचा म्हणजेच आरक्षणाचा हक्क हाच खरा समतेचा हक्क होऊ शकतो.

भारतीय संविधानामध्ये अनुसूचित जाती ,अनुसूचित जमाती , शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला वर्ग (ओबीसी) यांना शासकीय सेवांमध्ये आरक्षण दिलेले आहे कलम १५(२) १५ (३)१५ (४)१५ (५) १६(१) १६(४) १६४(क)१६४(ख)३०(१)४६ ३३५, ३३६ ,३४०, ३४१, ३४२. या कलमामध्ये सामाजिक आरक्षण प्रदान करण्यात आले आहे.

विशेष समांतर आरक्षण महिला,माजी सैनिक ,अपंग,प्रकल्प ग्रस्त, भूकंपग्रस्त, आंतरराष्ट्रीय खेळाडू यांच्यासाठी करण्यात आली आहे.

आर्थिक न्याय अर्थात आर्थिक लोकशाहीच्या संदर्भात २२ नोव्हेंबर १९४८ रोजी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात .जे लोक सरकार बनविणार आहेत त्याच्या पुढे भारतीय संविधान एक आदर्श ठेवू इच्छिते हा आदर्श आर्थिक लोकशाहीचा आहे.

सामाजिक न्याय ,आर्थिक न्याय यांचे प्रतीक म्हणजे भारताचे संविधान आहे,संविधान हा राष्ट्र निर्मितीचा, देशाच्या संपन्नतेचा ,समृद्धीचा राष्ट्रीय ग्रंथ आहे.

**भिमराव जयवंत गाडे**
**९२७३५७४४३१**

# संत ताजुद्दीन बाबांची महिमा अपरंपार.

संत ताजुद्दीन बाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक मानल्या जाते.कारण संपूर्ण धर्माचे लोक बाबांच्या दर्शनासाठी येतात.भारत ही संतांची भूमी आहे. ही बाब संपूर्ण जग जाणतो.कारण या भुमित संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम,संत नामदेव,संत ताजुद्दीन बाबा,संत गजानन महाराज,संत साईबाबा इत्यादी अनेक संतांचा जन्म महाराष्ट्रात झालेला आहे.त्यामुळेच महाराष्ट्राला संतांची भूमीचा दर्जा मिळाला आहे.भारत भुमित कोणत्या-ना-कोणत्या रूपाने प्रत्येक धर्मात संत या भुमित जन्म घेत असतात व सर्वच धर्माच्या संस्कृतीचे जतन होत असते.आज संपूर्ण जग जाणते की भारत हे शांततेचे प्रतिक आहे.याचे मुख्य कारण म्हणजे या भुमित अनेक धर्म जन्माला आलेत त्यामुळेच अनेक संस्कृती दिसून येतात आणि मुख्यत्वे करून एकोप्याने राहतात हाच संत भुमिचा खरा गोडवा आहे. नागपूरातील संत ताजुद्दीन बाबा यांची अपार महिमा आपल्याला पहायला मिळते आणि जगजाहीर आहे. ताजुद्दीन बाबांचा जन्म २७ जानेवारी १८६१ ला नागपूर शहरापासून १५ किलोमीटरवर असलेल्या कामठी या गावी झाला.बाबा एकवर्षाचे असतांनाच त्यांच्या वडिलांचा देहान्त झाला.यानंतर त्यांच्या ९ वर्षाच्या वयातच आईचा सुध्दा स्वर्गवास झाला.यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजीने करून त्यांना लहाण्याचे मोठे केले.ताजुद्दीन कामठीतील मदरशांमध्ये शिकत होते. कामठीतील मदरशांमध्ये अचानक हजरत अब्दुल्ला शाह नावाचे फकीर आले आणि त्यांची नजर (बालक) बाबा ताजुद्दीनवर पडली.त्यावेळेस त्या फकीराने शिक्षकाला विचारले तुम इनको क्या पढाते हो शिक्षक स्तब्ध झाले आणि फकीरच म्हणाले यह बालक (बाबा ताजुद्दीन) जन्मसेही सब कुछ सीखकर आया है.इतके बोलुन फकीर तेथुन निघुन गेले.ताजुद्दीन बाबांना त्यांच्या मामांनी १८८१ मध्ये म्हणजे वयाच्या २० व्या वर्षी नागपूरची रेजीमेंट नं. १३ मध्ये भर्ती केले.तीन वर्षांनंतर त्यांना मद्रासमधील सागरला पाठविण्यात आले.मद्रासी पलटनमध्ये अचानक विराण जागेवर संत हजरत दाऊद यांच्याशी भेट झाली आणि संपूर्ण रात्र सोबत भजन-कव्वालीमध्ये तल्लीन झाले.



ताजुद्दीन बाबा स्वतः देवांच्या आठवणीत डुबुन रहायचे. असे सांगितले जाते की बाबांची ड्युटी शस्त्रभंडार देखभाल करण्यावर होती. बाबा आपला पहारा चोख देत होते, अशावेळी रात्री २ वाजता अचानक इंग्रज कैप्टन त्या जागेची पाहणी करायला आला. पाहणी झाल्यानंतर कैप्टन वापस जायला लागला. काही अंतरावर जात नाही तर त्याला जो शिपाई पहारा (ताजुद्दीन) देत होता तोच शिपाई पुन्हा दिसला.कैप्टनला गुस्सा आला पुन्हा वापस पहिल्या जागेवर गेला तर तीथे पहाले तर तो शिपाई (ताजुद्दीन)आपल्या जागेवरच होता.यानंतर इंग्रज ऑफिसरने बाबांना पेशीसाठी बोलावले व विचारले की आम्ही तुम्हाला दोन-दोन ठीकाणी पहाले.तुम्ही देवाचे अवतार आहात का? यावर बाबांना घुस्सा आला. परंतु इंग्रज समजले हा शिपाई साधारण व्यक्ती नसून संत महात्मा आहे.हा त्यांचा पहिला चमत्कार दिसून आला. कालांतराने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.बाबांची वेगवेगळी हरकते पाहून त्यांच्या आजीने ताजुद्दीनला पुन्हा कामठीला आणले व अनेक डॉक्टरांना दाखविले.परंतु त्यांनी आत्मा व परमात्माची एकरूपता अवगत केल्याचे दिसून आले.काही लोक त्यांना पागल समजायला लागले. परंतु हळूहळू त्यांच्या हातुन अनेक चमत्कार दिसायला लागले. पीडीत लोक आपले दुःख-वेदना बाबांना सांगायला लागले व त्यांच्या नेत्रदृष्टीने बरेही व्हायला लागले.बाबांचे चमत्कार दुर-दुर पर्यंत पसरायला लागले.परंतु काही लोक आपल्या चमत्काराचा चुकीचा फायदा घेत असल्याचे लक्षात आले. तेव्हा त्यांनी पागल असल्याचे सोंग करने सुरू केले व लोक त्यांच्या हरकतींना त्रासुन पोलिस कंप्लेंट केली व २६ ऑगस्ट १८९२ ला कामठीच्या कैन्टोनमेन्ट व जिल्हा मॅजेस्टेटने पागलखान्यात पाठविले. पागलखाण्यात लॉकपध्ये बंद केल्यानंतरही लोकांना बाबा नागपूरच्या अनेक भागात दिसत होते.हा चमत्कार सर्वच मोठ-मोठ्या ऑफिसरच्या लक्षात आला.असे अनेक चमत्कार लोकांना दिसायला लागले व बाबा ताजुद्दीन संत झाले.२१ सप्टेंबर १९०८ ला नागपूरचे महाराजा श्रीमंत राजा बहादुर राधोजीराव भोसले यांच्या प्रयत्नाने बाबांना पागलखान्यातुन मुक्त केले राजाने आपल्या महालात आणले व राजांनी ताजुद्दीन बाबांची सेवा केली.संत ताजुद्दीन बाबा हिंदू-मुस्लिमांचे प्रेरणादायी प्रतिक होते.बाबांची तब्बेत काही दिवसांत खालावली व १७ ऑगस्ट १९२५ ला श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची प्राणज्योत मालवली. त्यामुळे नाम समाधी म्हणून सक्करदरा येथील श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची समाधी बांधण्यात आली यालाच लहान ताजबाग म्हणतात.इथे हिंदू प्रथेनुसार मोठ्या प्रमाणात आजही पुजा-अर्चना केली जाते व अंतिम संस्कार लहान ताजबागपासुन एक किलोमीटर अंतरावर असलेल्या ताजबाग येथे करण्यात आला याला मोठा ताजबाग म्हणतात. इथे मुस्लिम पध्दतीने पुजाअर्चना केली जाते.याप्रमाणे मोठा ताजबाग व लहान ताजबाग हे दोन्ही पवित्र स्थान भारतभर प्रसिद्ध आहे या ठीकाणी दोन्ही धर्माचे लोक एकत्र येतात ही नागपूरसाठी गौरवास्पद बाब आहे.संत ताजुद्दीन बाबांनी आपले पाय ज्या-ज्या ठिकाणी रोवले त्या-त्या ठिकाणी दर्गा आपल्याला पहायला मिळते व बाबांचे दर्शन होते.बाबाचे अनेक प्रसिद्ध ठिकाण आहेत यात मोठा ताजबाग, लहान ताजबाग, वाकी, पागलखाना हे प्रसिद्ध ठिकाण आजही प्रसिद्ध आहे.बाबाच्या जयंती निमित्त शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात येते.त्यामुळे संपूर्ण भक्तांना विनंती आहे की, वाढते हवामानातील बदल व प्रदुषणाचा धोका पहाता बाबांच्या जयंतीच्या निमित्ताने आपापल्या पद्धतीने संपूर्ण धर्माच्या भक्तांनी वृक्षारोपण करावे.यामुळे आपल्याला शुद्ध हवा मिळेल व ऑक्सिजनची मात्रा वाढेल यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. अशा पध्दतीने वृक्षलागवड झाली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात व जळामुळात आपल्याला बाबांचे दर्शन अवश्य होईल व ही आठवण मनुष्याच्या हृदयात अनंत काळापर्यंत राहील.कारण बाबांचा सहवास नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचा त्यामुळे वृक्षलागवड अती आवश्यक आहे.संत ताजुद्दीन बाबांना कोटी कोटी प्रणाम.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो. नं.९९२१६९०७७९ नागपूर**

# प्रजासत्ताक, प्रजेची सत्ता आणि सत्य..

आपण सत्तेहत्तरावा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. प्रजासत्ताक दिन जरी आपण दरवर्षी साजरा करत असलो तरीही अजूनही देशातील नव्वद टक्के पेक्षा जास्त लोकांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, पार्श्वभूमी, आणि गांभीर्यच नाही. हि केवळ शोकांतिका नाही तर आपण स्वतःला कितीही हुशार, बुद्धिमान व सुशिक्षित समजत असलो तरीही प्रजासत्ताक दिन, संविधान आणि देश याबाबत आपली अक्कल, आपले विचार शुन्य असुन आपला मेंदू विकसित झाला नसल्याचे हे प्रमाण आहे. स्वतःला सुशिक्षित, विद्वान समजणाऱ्यांना जर संविधान, प्रजासत्ताक आणि देश हे जर समजत नसेल, याबाबत जागृती नसेल तर ती विद्वत्ता आणि ते शिक्षण कोणत्याही कामाचे नसुन तो असणारा केवळ बौद्धिक मतीमंद व्यक्ती होय. बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिवस म्हणजे सुट्टीचा दिवस वाटतो तर बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिन म्हणजे झेंडा दिवस वाटतो. शाळेत किंवा जिथे कुठे प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो त्या ठिकाणी प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ, प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व व त्याचे फायदे यावर कधीच सखोल आणि निष्पक्ष चर्चा वा प्रबोधन झालेच नाही. स्वतः ला सुशिक्षित व विद्वान समजणाऱ्या लोकांना जर प्रजासत्ताक दिनाचा अर्थ व महत्त्व कळत नसेल तर आपले शिक्षण व विद्वत्ता कोणत्या गुणवत्तेची आहे हे तपासणे आवश्यक आहे. स्वंयघोषित सुशिक्षित व विद्वान हा उल्लेख वारंवार यासाठी करावा लागत आहे की याच लोकांची बौद्धिक पातळी अशी असेल तर गाव खेड्यातील अडाणी आणि कष्टकरी जनतेला प्रजासत्ताक दिन व त्याचे गांभीर्य कसे कळेल? त्यांना प्रजासत्ताक चा खरा अर्थ कोण सांगणार? प्रजासत्ताक देशामध्ये अडाणी, कष्टकरी गाव खेड्यात राहणाऱ्या लोकांचे काय स्थान आहे? प्रजासत्ताक व्यवस्थेचा खरचं तळागाळातील लोकांना फायदा झाला का? असे अनेक प्रश्न आहेत ज्यावर चर्चा, संमेलन व जागृती होणे गरजेचे आहे. केवळ शहीदांचे गाणे लाऊन देशभक्तीचा देखावा करता येत नाही. जिवाची बाजी लावून ब्रिटीशांच्या तावडीतून देशाला स्वातंत्र्य करताना जे जवान शहिद झाले, ज्यांनी आपले आयुष्य भारतीयांना हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी, देशाचा विकास होण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले त्यांचे स्मरण करण्याचा दिवस अर्थात पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करतो. परंतु प्रजासत्ताक दिनी शहिदांचे गाणे लाऊन लोकांना भावनिक करून मुळ मुद्यावरून लक्ष विचलित करून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व लोकांना कळूच नये अशी रितसर व्यवस्था केली जाते. प्रजासत्ताक दिनी चर्चा व्हायला पाहिजे ती संविधानावर, संविधान निर्माण करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर. पण आजही संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही घेण्याचे धाडस येथील विकृत व बौद्धिक कमकुवत लोकांकडून होत नाही. याचे कारण ते कितीही शिकलेले असतील तरीही त्यांच्या मेंदुचा विकासच झालेला नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान हे देशाचे आहे. संविधानावर देश चालतो, संविधान निर्माण झाले म्हणून प्रजासत्ताक दिन आपण साजरा करतो. देशाचे सर्वोच्च असलेले संविधान आजही काही लोक विशिष्ट लोकांचे संविधान आहे असे समजून संविधान वाचत नाहीत, घरात आणत नाहीत म्हणजे किती ही बौद्धिक दिवाळखोरी आहे. संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून कित्येक लोक संविधान घरात आणत नाहीत अशा मानसिकतेच्या लोकांना कसे विद्वान म्हणता येईल. मोठमोठ्या महाविद्यालयात शिकून, अंगावर पांढरे कपडे घालून आणि लाखात पगार घेणे म्हणजे हुशार किंवा सुशिक्षित आहे असे मुळीच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धांचे आहेत म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर नाकारणारे लोक बौद्धिक दरिद्री तर आहेतच पण देशद्रोही आणि धर्मद्रोही सुद्धां आहेत. कारण संविधान हे देशाचे आहे. आणि भारतीय माणसाने भारतचे संविधान लिहले. आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा संविधान लिहले तेव्हा ते हिंदूच होते. जगातील सर्वात मोठा विद्वान तत्कालीन हिंदू, जगातील सर्वोच्च संविधान ही बाब हिंदू धर्मीयांसाठी धर्माचा व्यक्ती म्हणून आणि जगात सर्वात सुंदर संविधान लिहले म्हणून देशाचे नागरिक म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करणे किती गौरवाची बाब आहे. पण हे ज्यालाच कळेल जो खरा धर्माचा आणि खरा देशाचा आहे. बरेच लोक म्हणतात संविधान बदलायला पाहिजे. का बदलायला पाहिजे तर केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले, त्यातील बराचसा भाग इतर देशाकडून घेतलेला आहे वगैरे वगैरे बोलुन स्वतः ची अक्कल पाजळत बसतात. पण ते हे करतांना आपल्याच धर्मातील तत्कालीन विद्वान आणि हुशार दोनशे चौऱ्यांशी लोकांनी संविधान देशाच्या वतीने स्विकृत केले म्हणजे आजचे स्वयंघोषित विद्वान त्या दोनशे चौऱ्यांशी लोकांच्या देशभक्ती वर व विद्वतेवर प्रश्नच निर्माण करत नाहीत तर त्यांची विद्वत्ता झूगारून लावतात. त्या स्वधर्मीय लोकांपेक्षा आजचे स्वयंघोषित लोक जास्त हुशार झाले का? दोनशे चौऱ्याशी लोकांच्या सह्या झाल्या तेव्हा कुठे डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे शिल्पकार ठरले. आणि याच संविधानाने अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक माणसाला माणसात आणले, गरीब, श्रीमंत, स्त्री पुरुष किंवा जाती धर्म याचा विचार न करता केवळ व्यक्ती म्हणून मान सन्मान आणि संधी निर्माण करून करू दिली. देशाच्या संपत्तीत प्रत्येकाला समान हिस्सा दिला. झोपडीतील, शेतीतील, महालातील, श्रीमंत माणसाला एकच महत्त्व दिले आणि सर्वांना देश चालवण्याचा अधिकार दिला. ते दिले म्हणून चौकटीत च्या आत असणाऱ्या महिला विमानात फिरतात, चुल आणि मुलच सांभाळणाऱ्या महिला आज जिल्हा देश सांभाळत आहेत, महिलांनी पुरुषांच्या समोर उभेही राहू नये असे असताना आज पुरूषांच्या समोर स्त्रिया जात आहेत, चहा विकणारा देश चालवत आहे हे केवळ आणि केवळ भारतीय संविधानाने मुळ शक्य झाले. जनतेच्या हातात सत्ता संविधानाने दिली. याचा अर्थ कोणत्याही प्रकारचा भेद न करता कोणताही योग्य व्यक्ती जो मतदार आहे देशाच्या कोणत्याही भागात देशाचा कारभार करणयासाठी निवडणूकीच्या माध्यमातून किंवा नोकरीच्या माध्यमातून जाऊ शकतो तिथे गरीब श्रीमंत स्त्रि पुरुष किंवा जात धर्माचा कोणताही भेद केला जात नाही. यालाच जनतेची सत्ता म्हणतात. जनतेच्या हितासाठी जनतेनेच आपला कारभार करून आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगती करून घेणे म्हणजे प्रजासत्ताक आहे. प्रजासत्ताक देशात संविधानाने बोलण्याचा, अभिव्यक्त होण्याचा, व्यवसाय करण्याचा, शिक्षणाचा, सार्वजनिक मालमत्तेचा व नैसर्गिक साधन संपत्तीचा उपभोग घेण्याचा अधिकार दिला पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा अधिकार नाकारला कोणी यावरही चर्चा होणे आवश्यक आहे. महिलांवर बंधने घालून त्यांना गुलाम करून शिक्षण व विकासापासून कोणी दुर केले होते? मुलींनी घराबाहेर पडू नये, मुली शिकल्या म्हणजे धर्म बुडतो असे माणल्या जाणाऱ्या समाजातील स्त्रियांना पुरुषां प्रमाणे मानसन्मान, शिक्षण, नोकरी आणि पगार देऊन सामाजिक व आर्थिक उन्नती करणारे संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल किती महिला प्रामाणिक आहेत. अंगावर महागडी साडी, चेहऱ्यावर फांऊंडेशन, हे फक्त संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत. कोणत्याही धर्माने महिलांना एवढे हक्क अधिकार तर सोडा पण महिलेला माणूस म्हणून सुद्धां सन्मान दिला नाही ते महान काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केले. गरिबातील गरीब व्यक्तीही शिक्षण घेऊ शकतो, निवडणूक लढू शकतो आणि देश चालवू शकतो हे संविधानाने दिलेले अधिकारी असले तरीही सत्य काय आहे यावर विचार केला तर शिक्षण आणि निवडणूक धनदांडग्या लोकांच्या हाती गेले. निवडणूक व्यक्तीचे काम नाही तर पैसा बघून लढवली जाते. प्रजेची सत्ता असताना प्रजेला एवढे भिकारी बनवले कि प्रजा निवडणुकीत हजार पाचशे घेऊन कोणालाही मत देते ही व्यवस्था निर्माण केली गेली. हजार पाचशे एका मतासाठी देणारा निवडून आला कि किती कमवत असेल याची कल्पना सर्वसामान्य मानसाला नसणारच आहे. संविधानाने अभिव्यक्त होण्याचा अधिकार दिला असला तरीही येथे जनतेचा आवाज दाबला जातो, जनतेच्या समस्या लक्षात घेतल्या जात नाहीत, अडाणी, पाखंडी लोक राजकारणात जाऊन धर्माच्या आडून चुकिचा इतिहास, चुकिचा धर्म सांगुन लोकांना बौद्धिक गुलाम व भक्त बनवत आहेत. जनतेचा आवाज कोणीच ऐकायला तयार नाही. मिडिया निवडणूक आयोग, विरोधी पक्ष आणि धर्माचे लोक सत्तेचे गुलाम झाल्याने जनतेच्या समस्या वाढत आहेत आणि जे सत्तजसोबत हात मिळवणी करत आहेत त्यांची भरभराट होत आहे. प्रजासत्ताक मध्ये सत्ता जनतेच्या हाती असण्याचे एकमेव शस्त्र म्हणजे मताधिकार हा मताधिकार इव्हिएम च्या माध्यमातून काढून घेतला आहे. जनता विरोधात, कार्यकर्ते विरोधात, नेते विरोधात असतानाही जर तेच लोक निवडून येत असतील तर त्यांना लोकांच्या मताची नाही तर यंत्राची गरची आहे. म्हणून लोक पेपर वर निवडणुक व्हायला पाहिजे म्हणत असताना ही यंत्रावर होत आहेत. याचाच अर्थ प्रजेची सत्ता येण्या आधीच प्रजेला सत्तेपासून कोसो दुर नेले जात आहे आणि हेच सत्य आहे. लोकशाही मध्ये सत्य बोलणे गुन्हा आणि भ्रष्टाचार, व्यभिचार, धार्मिक कट्टरता पाळणे संस्कार झाले आहेत. देश अधोगतीला जात असताना देशातील मुठभर नेते मात्र देशातील माया जमवत आहेत हे लोकशाहीला मारक आहे. खरी लोकशाही, खरा प्रजासत्ताक दिन यावर चर्चा प्रबोधन होत नाही आणि एक भारतीय भारताच्या विकासाचा ग्रंथ वाचत नाही तो देश कशाच्या आधारावर प्रगती करेल? जगाला लाजवेल असे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण करून वेगवेगळ्या जातीधर्माला, वेगवेगळ्या बोलीभाषेला, वेगवेगळ्या खानपान असलेल्या, वेगवेगळी वेशभूषा असलेल्या आणि वेगवेगळी नावे असलेल्या लोकांना एकच ओळख भारतीय म्हणून देऊन समान हक्क अधिकार बहाल केले आणि ते जनतेला लागु झाले तो हाच दिवस २६ जानेवारी. प्रजासत्ताक दिनांचा विजय असो. भारताचे संविधान आणि संविधानाचे निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन.




प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय सदिच्छा

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवाची गौरवशाली परंपरा वृंध्दिगत करावी..,पूर्वतयारी आढावा बैठकीत ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी : ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून हा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात येत असून या वर्षी महोत्सवाचे ७३ वे वर्ष आहे. गत ७२ वर्षापासून सुरु असलेल्या या महोत्सवाला गौरवशाली परंपरा असून ही परंपरा अधिकाधिक वृंध्दिगत करावी, असे आवाहन देवस्थान समितीचे ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.



श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. यावेळी ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे बोलत होते. या प्रसंगी विश्वस्त अशोक भोसले, रमेश बिसेन, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, व्यंकटेश हालिंगे यांच्यासह प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर परजिल्ह्यासह कर्नाटक राज्यात श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सव पोहोचला असल्याचे सांगून या यात्रा महोत्सवाला हजारो भाविकांसह नागरीकांचा मोठा सहभाग नोंदवला जात असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी स्पष्ट केले. ७२ वर्षापासून सदर यात्रा महोत्सव भरविण्यात येत असून यात्रा महोत्सवाला यशस्वी करण्यासाठी लातूरसह परिसरातील अनेक शिवभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते आपले योगदान देतात. त्याच बरोबर विश्वस्तही तितक्याच ताकदीने या सर्वांच्या पाठिशी उभे राहून यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ताकद देत असतात. या महोत्सवाला सिध्देश्वर महाराजांच्या आशिर्वादाने व सर्वांच्या सहकार्याने गौरवशाली परंपरा लाभलेली असून ही परंपरा वृंध्दीगत करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी सांगितले.यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विविध समित्या गठीत होत असून या समितीतील प्रत्येक सदस्यांनी योगदान द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

यात्रा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी या बैठकीत विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून यामध्ये झेंडा मिरवणूक, यात्रा स्टॉल, पशु व कृषी प्रदर्शन, कुस्ती, भोजन, भजन व किर्तन, अभिषेक, संरक्षक, स्वयंसेवक, विद्यूत व पाणी पुरवठा, प्रसाद वाटप, पास दर्शन, रुद्राभिषेक व महिला स्पर्धा, रचना व सजावट आणि प्रसिध्दी समितीचा समावेश आहे. या समितीच्या माध्यमातून यात्रा महोत्सव यशस्वी करून महोत्सवाची गौरवशाली परंपरा जोपासली जाईल, असा विश्वास या समितीचे प्रमुख व समिती सदस्यांनी व्यक्त केला आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने धिरज विलासराव देशमुख यांचा मतदारांशी थेट संवाद.



लातूर : लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी रेणापूर तालुक्यातील कारेपुर, तळणी, मोहगाव, मुरढव व गोविंदनगर येथे प्रचार सभा व बैठका घेऊन मतदारांशी थेट संवाद साधला.

यावेळी बोलताना धिरज देशमुख म्हणाले की, काँग्रेस पक्षाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी सक्षम व कार्यक्षम उमेदवार दिले आहेत. काँग्रेस पक्षाला जनसेवेची उज्ज्वल परंपरा असून पक्षाचा विचार हा नेहमीच विकासाभिमुख राहिला आहे. त्यामुळे ५ फेब्रुवारी रोजी होत असलेल्या मतदानात मतदार निश्चितपणे काँग्रेस पक्षाच्या पाठीशी आपली ताकद उभी करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून विकास कसा साधता येतो, हे आम्ही प्रत्यक्ष कामातून दाखवून दिले आहे. याउलट भाजपच्या नेत्यांनी केवळ दिशाभूल करून फसवे विकास मॉडेल उभे केले असल्याचा आरोप त्यांनी केला. हा फरक मतदारांनी ओळखला असून यावेळी त्याचे प्रतिबिंब मतदानातून दिसून येईल, असेही ते म्हणाले.

काँग्रेस पक्षाचा विचार हा नेहमीच लोककल्याणाचा राहिला असून शेतकरी, शेतमजूर, युवक, महिला व सर्वसामान्य नागरिक हे काँग्रेसच्या राजकारणाचा केंद्रबिंदू आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक, जबाबदार व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा आमचा ठाम निर्धार असल्याचे धिरज देशमुख यांनी स्पष्ट केले.

५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानात लोकहित, विकास आणि प्रगतीसाठी काँग्रेस पक्षाला साथ देण्याचे आवाहन यावेळी मतदारांना करण्यात आले.

विविध ठिकाणच्या प्रचार बैठकीस काँग्रेस पक्षाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या पाणबुडी मोटर व म्हशी चोरी करणाऱ्या संघटित टोळीचा पर्दाफाश. चार आरोपी जेरबंद, ९.२६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त.




लातूर :-लातूर जिल्ह्यात शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी तसेच परवाना असलेल्या हॉटेल व बिअर बार फोडून विदेशी दारू चोरी करणाऱ्या संघटित टोळीवर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत नियोजनबद्ध व धाडसी कारवाई केली आहे. या कारवाईत चार सराईत आरोपींना अटक करून तब्बल ९,२६,२४०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २४/०१/२०२६ रोजी मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे व मा.अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या नेतृत्वात विशेष पोलीस पथकाची निर्मिती करण्यात आली. सदर पथक मुरुडअकोला परिसरात लातूर जिल्ह्यात घडलेल्या शेतातील साधनसामग्री चोरीतील संशयित गुन्हेगारांचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लातूर ते मुरुड जाणाऱ्या रस्त्यावर करकटा पाटी येथील एका बार समोर पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहना सह चार संशयित इसम संशयास्पदरीत्या थांबले आहेत . या माहितीच्या आधारे तात्काळ नियोजनबद्ध सापळा रचण्यात आला. दुपारी १४.३० वाजता संशयित वाहनासह खालील चारही इसमांना ताब्यात घेण्यात आले.

१) महादेव उर्फ बापु सुरेश चव्हाण, वय ४५ वर्षे रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी, जि. धाराशिव

२) राहुल निवत्ती काळे, वय २३ वर्षे रा. साठे चौक, धाराशिव, जि. धाराशिव

३) तेजस उर्फ पप्पु भिमराव शिंदे, वय ३५ वर्षे रा. पिंपळगाव, ता. वाशी, जि. धाराशिव

४) नितीन गजेंद्र काळे, वय ३२ वर्षे रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी, जि. धाराशिव

असे असून त्यांची अंगझडती व वाहन तपासणी केली असता त्यामध्ये रोख रक्कम : छ१,५७,०००/-, ५ एचपी क्षमतेच्या १० पाणबुडी मोटारी, विदेशी दारूचे २३ बॉक्स,गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेले महिंद्रा कंपनीचे बोलेरो पिकअप वाहन (एम.एच. ४४ यू १३१६) असा मुद्देमाल मिळून आला. नमूद आरोपींची सखोल चौकशी केली असता आरोपींनी कबुली दिली की, ते आपल्या इतर तीन फरार साथीदारांसह गेल्या एक वर्षापासून लातूर, धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी चोरी करीत होते. तसेच काही दिवसांपूर्वी वैराग जिल्हा सोलापूर परिसरातील एक बिअर बार अँड परमिट रूम फोडून मोठ्या प्रमाणावर विदेशी दारू चोरी केली होती. विविध चोरीचा माल विकून मिळालेली रक्कमच त्यांच्या ताब्यात आढळून आलेली रोख रक्कम असल्याचे सांगितले.

आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे जिल्ह्यातील पुढील पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांशी त्यांचा थेट संबंध असल्याची खात्री झाली

पो.स्टे. मुरुड, शिरूर अनंतपाळ, अहमदपूर, कासार शिरसी, वैराग (जि. सोलापूर) इत्यादी ठिकाणी दाखल असलेले एकूण १० गंभीर गुन्हे उघड झाले असून या कारवाईत एकूण १० पाणबुडी मोटारी छ७१,८००/-, विदेशी दारू : छ१,९७,४४०/-,रोख रक्कम : छ१,५७,०००/- ,बोलेरो पिकअप वाहन : छ५,००,०००/-एकूण किंमत : छ९,२६,२४०/- (नऊ लाख सव्वीस हजार दोनशे चाळीस रुपये)

सदर सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चारही आरोपींना पुढील कारवाई करिता पोलीस स्टेशन मुरुड गुन्हा क्र. ३९३/२०२५, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये हजर करण्यात आले आहे. त्यांच्या फरार साथीदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली असून, लवकरच त्यांनाही अटक करण्यात येणार आहे.

ही कारवाई लातूर जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे, तांत्रिक कौशल्याचे आणि गुन्हेगारांविरोधातील कठोर भूमिकेचे उत्तम उदाहरण आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाने मिळवलेल्या मालमत्तेवर होणाऱ्या चोरीला आळा घालणे, व्यापाऱ्यांचे संरक्षण करणे आणि समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे हा पोलीस प्रशासनाचा दृढ संकल्प आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, अमर केंद्रे , राजेश घाडगे, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे,तुराब पठाण, रामलिंग शिंदे,राजेश कंचे,मोहन सुरवसे,तुळशीराम बरुरे, पाराजी पुट्टेवाड, गणेश साठे,गोविंद भोसले, चंद्रकांत केंद्रे,प्रदीप चोपणे, श्रीनिवास जांभळे,शैलेश सुडे, अंजली गायकवाड यांनी केली आहे.

# लातूर एमआयटी येथे उत्साहात प्रजासत्ताक दिन;,विविध वैद्यकीय गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

लातूर – भारतीय प्रजासत्ताक



दिनाच्या निमित्ताने माईर्सच्या एमआयटी वैद्यकीय शैक्षणिक संकुल, लातूर येथे सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.२५ वाजता लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या हस्ते विविध पुरस्कार वितरणासह वैद्यकीय गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.पी. जमादार यांनी अभिवादन केले. त्यानंतर मोठ्या उत्साहाच्या आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी वैद्यकीय शिक्षण द्वितीय वर्षाच्या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांनीस कै. मोनिका ढाका हा पुरस्कार यावर्षी हिंदवी बिराजदार यांना तर कै. जणाबाई ग्यानोबा शेप हा पुरस्कार प्रथम वर्षाच्या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या रुद्राणी रामशेट्टे यांना एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील स्त्रीरोग विभागीय परिषदेत संशोधन लेखास प्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. ऐश्वर्या सिरवीशेट्टी आणि डॉ. साक्षी खाडे यांचा सत्कार करुन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी लातूर एमआयटीचे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, नर्सींग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. सरवनन, दंत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. यतीश जोशी, डॉ. अमोल डोईफोडे, फार्मासी कॉलेजचे प्राचार्य डॉ. डिगे, डॉ. बि. डी. आडगावकर, डॉ. विद्या कांदे, डॉ. एन. व्ही. कुलकर्णी, डॉ. क्रांती केंद्रे, डॉ. राजेंद्र मालू, डॉ. लक्ष्मण कस्तुरे, डॉ. पठाण, डॉ. तोष्णीवाल, डॉ. सचिन सोमवंशी, एमआयटीचे मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, फिजीओथेरपी महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, डॉक्टर, कर्मचारी, विद्यार्थी, पालक व नागरीक ध्वजारोहन कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे येथे खून करून फरार झालेल्या आरोपींना चार्ली पथकाच्या सजगतेमुळे एमआयडीसी पोलिसांनी ठोकल्या बेड्या.

लातूर :-समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गंभीर गुन्हेगारीला आळा घालणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दल सातत्याने प्रभावी उपाययोजना राबवत आहे. याच अनुषंगाने एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत नियमितपणे चार्ली पेट्रोलिंग, गस्त, संशयितांवर नजर ठेवणे व गुन्हेगारांविरोधात तत्काळ कारवाई करण्यात येत आहे. या सतर्कतेमुळेच पुणे येथे खून करून फरार झालेल्या आरोपींना एमआयडीसी पोलिसांनी यशस्वीरित्या अटक करून मोठे यश संपादन केले आहे.

दिनांक २५/०१/२०२६ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत चार्लीचे पोलीस अंमलदार पेट्रोलिंग करीत असताना भांबरी चौक ते साई नाका रिंगरोड दरम्यान, एच.पी. पेट्रोल पंप समोरील झाडाखाली अंदाजे १८ ते २० वयोगटातील पाच अनोळखी इसम संशयास्पद अवस्थेत बसलेले आढळून आले. चार्ली पथकाने त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची, विसंगत व समाधानकारक नसलेली उत्तरे दिली. त्यांच्या वागणुकीत संशयास्पद हालचाली दिसून आल्याने चार्ली पथकाने त्यांना विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली.

प्राथमिक चौकशीत सदर इसम पुणे येथून आल्याचे सांगत होते, मात्र त्यांच्या येण्यामागील कारण, राहण्याची ठिकाणे, ओळखीची माहिती याबाबत ते टाळाटाळ करीत होते. त्यामुळे चार्ली अंमलदारांनी सतर्कता बाळगत सदर इसमांचे फोटो पुणे पोलीस दलाच्या अधिकृत व्हॉट्सप ग्रुपवर पाठवून खात्रीशीर माहिती मागविली. काही वेळातच पुणे पोलीस दलाकडून माहिती प्राप्त झाली की, हे पाचही इसम पुणे



शहरातील खराडी भागात दिनांक २४/०१/२०२६ रोजी घडलेल्या खून प्रकरणातील फरार आरोपी आहेत. ही माहिती मिळताच चार्ली पथकाने तात्काळ एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या डीबी स्टाफला कळविले. पोलीस निरीक्षक श्री. समाधान चवरे यांच्या आदेशान्वये डीबी पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले. योग्य ती खबरदारी घेऊन पाचही संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले व त्यांना एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले.

पोलीस स्टेशनमध्ये सखोल चौकशी केली असता, ते वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर नंबर ६९/२०२६, कलम १०३(१), ३३३, १८९(२), १८९(४), १९०, १९१(३), ३५२ भा.न्या.सं. (इछड) व सहकलम ४, २५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये दाखल असलेल्या खून व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.

सखोल तपासात आरोपींनी आपली नावे व राहण्याचे पत्ते

१) कैलास विठल राठोड,

२)गणेश चंद्रकांत कटटे,

३)सुशील सुभाष कदम, सर्व राहणार रा. बायपास, खराडी, जि. पुणे

४) करण विठ्ठल तुरे, रा. चंदननगर, पुणे

५) रोहित विकास गायकवाड, रा. नानापेठ, पुणे

असे असल्याचे सांगितले. या सर्व आरोपींनी पुणे शहरातील खराडी परिसरात एका व्यक्तीचा खून करून गुन्हा केल्यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यात पलायन केले होते. एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत लपून बसलेल्या या आरोपींना चार्ली पथकाच्या सजगतेमुळे अटक करण्यात आली, ही बाब लातूर पोलिसांची सतर्कतेचे व कार्यक्षमतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

सदर बाब तात्काळ वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. त्यांचे विशेष पथक एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे दाखल झाल्यानंतर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सदर आरोपींना पुढील तपासकामी त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही संपूर्ण यशस्वी कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर, श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर

यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस स्टेशनचे

पोलीस निरीक्षक श्री. समाधान चवरे यांच्या नेतृत्वाखाली खालील अधिकारी व अंमलदारांचे व चार्ली पथकामधील तुळशीदास घडे,विजय जाधव, डीबी पथकामधील

सपोउपनि. भिमराव बेल्लाळे,पोलीस अंमलदार सचिन कांबळे, राजाभाऊ मस्के,अक्षय डिगोळे, सिद्धेश्वर टोम्पे, यांनी केली असून या कारवाईमुळे लातूर जिल्हा पोलीस दलाची तत्परता, गुन्हे शोधण्यातली कुशलता, आंतरजिल्हा समन्वय आणि नागरिकांच्या सुरक्षिततेप्रती असलेली बांधिलकी दिसून येते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.